पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/०६/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०६/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
३. मा.भोईर सुरेश शिवाजी
४. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बोदाडे – सहा.आयुक्त, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) प्र.क्र.२९ मधील एम.आय.डी.सी.परिसरांतील रस्ते डांबरीकरण करणेचे कामाचे साईट बदलास मान्यता मिळणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.

---------

दिनांक **०२/०६/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १२ | विषय क्रमांक – ०१

दिनांक – १६/०६/२०१७ | विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.शारदा सोनवणे | अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/३४२/२०१७, दि.३१/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रसारमाध्यम प्रतिनिधींना वितरीत करावयाच्या मोफत बस प्रवास पासेसबाबत आकारावयाच्या रक्कमेबाबत (राज्यशासनाकडून प्राप्त झालेले अधिस्वीकृती ओळखपत्रधारक पत्रकरांना वार्षिक रकमेच्या १०% रक्कम स्विकारून व अधिस्विकृती ओळखपत्र नसलेल्या प्रसार माध्यम पत्रकारांकरिता वार्षिक रक्कमेच्या २५% रक्कम स्विकारून सवलत देणेबाबत)

**नियम व अटी:-**

१. राज्य शासनाकडून वितरीत केल्या जाणा-या अधिस्विकृती ओळखपत्रधारक असल्यास सदर प्रसारमाध्यम प्रतिनिधींना वार्षिक बसपास रकमेच्या १०% रक्कम अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.

२. अधिस्विकृती ओळखपत्र नसल्यास पास रकमेच्या एकूण वार्षिक रकमेपैकी २५% अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- रक्कम मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.

३. दैनिक/साप्ताहिकांचे अंक नियमित मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये वितरीत होणे आवश्यक राहील. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांमधील प्रतिनिधी यांची मनपाच्या विविध पत्रकार परिषदा,कार्यक्रमांना उपस्थिती व आवश्यक प्रसिद्धी होणे आवश्यक राहील. तसेच प्रसिद्धी करण्यात आलेल्या वृत्तांचे वृत्तपत्रे मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये नियमित वितरीत करणे आवश्यक राहील.

४. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांकडील फक्त एका प्रतिनिधीस पास देण्यात येईल.

५. ज्या पत्रकारास पास द्यावयाचा आहे अशा पत्रकाराची पिंपरी चिंचवड महानगरपालिका वार्तांकनाकरीता नियुक्ती करण्यात आले असल्याचे मा.संपादक यांचे पत्र.

६. इलेक्ट्रॉनिक वाहिन्या संदर्भात संबंधित इलेक्ट्रॉनिक वाहिनीचे प्रसारण किमान स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित प्रतिनिधींनी पिंपरी मनपाकडील वार्तांकन करणे/प्रत्यक्ष संपर्क साधणे आवश्यक आहे.

७. वरीलप्रमाणे दैनिक/साप्ताहिके/इलेक्ट्रॉनिक वाहिन्यांचे प्रतिनिधींनी मागील किमान सहा महिन्याचे कालावधीत मनपा मुख्य कार्यालय/अन्य कार्यालये कडील वार्तांकन/छायाचित्रण केलेले असणे आवश्यक आहे.

८. पिंपरी मनपा मुख्य भवनात येणारे प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, पिंपरी मनपा वार्तांकन, छायाचित्रण करणारे प्रतिनिधींचे बाबतीत पिंपरी मनपातील माहिती व जनसंपर्क विभागाने वरीलप्रमाणे निकषास अनुसरुण पास देणेबाबत प्रक्रिया करावी.

९. वरीलप्रमाणे निकषात बदल करणे, नवीन निकष समाविष्ट करणे, रद्द करणे, पासा संदर्भात निश्चित आकडेवारी निश्चित करणे अथवा प्रक्रिया राबविणेकरिता येणा-या अडचणी, करावयाचे बदल अथवा काही अडचणी निर्माण झाल्यास याबाबत संपुर्ण अधिकार पिंपरी महानगरपालिका स्तरावर – पिंपरी महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचेकडे राहतील.

१०. प्रसिध्दी माध्यमांकरिता पासेसची रक्कम लेखा विभागामार्फत खर्ची टाकणेत येईल.

सदर प्रमाणे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी मोफत बस पास योजनेच्या अटी व शर्तीसह धोरण ठरविणेकामीचा प्रस्तावास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रसार माध्यम प्रतिनिधींना प्रचलित अटी-शर्ती कायम ठेवून मोफत बसपास देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेतयेत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १६/०६/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शारदा सोनवणे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या प्र.क्र.२९ मधील एम.आय.डी.सी.परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्याचे (निविदा क्र.२९/१-२०१४-१५) कामाचा आदेश ठेकेदार यांना दि.१२/०२/२०१५ रोजी देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी त्या परिसरातील सुमारे ८० टक्के काम पूर्ण केलेले आहे. परंतु त्याठिकाणी साईट उपलब्ध नसल्याने काम इतर ठिकाणी करणे आवश्यक आहे. इंद्रायणीनगर येथील नविन प्रभाग क्र.८ मधील से.क्र.४, ६, ९, ११ व १३ मधील रस्ते अत्यंत खराब झालेले आहेत व त्या भागात सध्या काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निविदा क्र.२९/१-२०१४-१५ मधील उर्वरित शिल्लक काम वर नमुद ठिकाणी करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८८८/२०१७
दिनांक : २२/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2016 sub committee sabhapati.doc